


# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

**डॉ. प्रभाकर देसाई**

एम.ए., पीएच्.डी.

**संचालक**


संदर्भ क्र. विविमं/२०१७–१८/२९०  दिनांक : ०८/०९/२०१७

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठीशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,

**विषय : भारत छोडो आंदोलनास ७५ वर्षे व भारतीय स्वातंत्र्यास ७० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मानव संसाधन विकास मंत्रालयाने निर्देशित केल्याप्रमाणे विविध उपक्रमांचे आयोजन अहवाल.**

संदर्भ क्र. : १. D.No.F.1-1/2017(Secy), 04th August, 2017
२. या विभागाचे विविमं/२०१७–१८/२६१, दि. ०७/०८/२०१७ चे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त सदर्भीय पत्र क्र. १ अन्वये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार दि. ९ ते ३० ऑगस्ट, २०१७ ह्या कालावधीत आपल्याला स्वातंत्र्यचळवळीच्या व स्वातंत्रसैनिकांच्या गौरवार्थ विविध उपक्रमांचे आयोजन अतिशय काटेकोरपणे करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने दिले आहेत. त्यानुसार आपल्यामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा छायाचित्रांसहचा अहवाल MHRD Facebook वर प्रकाशित करावा.

तसेच उपरोक्त सदर्भीय पत्र क्र. २ अन्वये ह्या सर्व कार्यक्रमांचे व उपक्रमांचे आयोजन आपल्यामार्फत अतिशय काटेकोरपणे व्हावे आणि सदर उपक्रमांची छायाचित्रे व अहवाल विद्यार्थी विकास मंडळाने उपलब्ध करून दिलेल्या संकेतस्थळजागी (BSD Online वर ही लिंक उपलब्ध करून दिली जाईल) अपलोड करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार यासंदर्भात आपण केलेल्या कार्यवाहीचा छायाचित्रांसह अहवाल विद्यापीठ संकेतस्थळाच्या पुढील लिंकवर (www. unipune.ac.in – Students' Developement – BSW Online – College Login–*For College Users* – Login – Main Menu – Students Developement-Menu- India Freedom Struggle Report) **ऑनलाईन पद्धतीने दि. १३ सप्टेंबर, २०१७ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत** अपलोड करण्यात यावा.

संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०१७–१८/२६१ दिनांक : ०७/०८/२०१७

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठीशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,

**विषय : भारत छोडो आंदोलनास ७५ वर्षे व भारतीय स्वातंत्र्यास ७० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मानव संसाधन विकास मंत्रालयाने निर्देशित केल्याप्रमाणे विविध उपक्रमांचे आयोजन.**
**संदर्भ क्र. : D.No.F.1-1/2017(Secy), 04th August, 2017**

महोदय/महोदया,

२०१७ साली भारत छोडो आंदोलनास ७५ वर्षे व स्वातंत्र्यप्राप्तीस ७० वर्षे पूर्ण होत आहेत त्यामुळे २०१७ साल हे भारताच्या इतिहासातील अतिशय महत्त्वाचे वर्ष आहे. त्यामुळे ९ ते ३० ऑगस्ट, २०१७ ह्या कालावधीत आपल्याला स्वातंत्र्यचळवळीच्या व स्वातंत्रसैनिकांच्या गौरवार्थ विविध उपक्रमांचे आयोजन अतिशय काटेकोरपणे करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने दिले आहेत.

- ९ ते ३० ऑगस्ट दरम्यान 'न्यू इंडिया मंथन' ह्या शीर्षकाखाली तज्ज्ञ संसाधन व्यक्तींना बोलावून वाद–विवाद व चर्चासत्र स्वरूपाचा कार्यक्रम आयोजित करणे.
- ९ ऑगस्ट २०१७ रोजी सकाळी ९.३० वाजता आपल्या शैक्षणिक परिसरातील सर्व विद्यार्थ्यांना शपथ देणे (विशेष शपथ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)
- स्वातंत्रसैनिकांच्या स्मारकांना, स्वातंत्र्य लढ्यातील ऐतिहासिक ठिकाणांना, वास्तूंना, सैनिकी छावण्यांना, पोलिस छावण्यांना भेटी देण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शक सहलीचे आयोजन करणे.
- UGC व mygov ह्या संकेतस्थळांवर उपलब्ध असणाऱ्या प्रश्नमंजुषा कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सहभाग घेण्यास प्रवृत्त करणे.

ह्या सर्व कार्यक्रमांचे व उपक्रमांचे आयोजन आपल्यामार्फत अतिशय काटेकोरपणे व्हावे आणि ह्या सर्वांचा छायाचित्रांसहचा अहवाल MHRD Facebook वर प्रकाशित करावा. त्याबरोबरच ह्या सर्व कार्यक्रमांचे आयोजन करतांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा, विद्यार्थी विकास मंडळाचा/राष्ट्रीय सेवा योजनेचा ठळक निर्देश कार्यक्रमाच्या बॅनरवर असणे अनिवार्य आहे, याची नोंद घ्यावी. तसेच सदर उपक्रमांची छायाचित्रे व अहवाल विद्यार्थी विकास मंडळाने उपलब्ध करून दिलेल्या संकेतस्थळजागी (BSD Online वर ही लिंक उपलब्ध करून दिली जाईल) अपलोड करावेत.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ

प्रो. (डॉ.) जसपाल एस. सन्धू
सचिव
Prof. Dr. Jaspal S. Sandhu
MBBS, MS (Ortho), DSM, FAIS, FASM, FAFSM, FFIMS, FAMS
Secretary

विश्वविद्यालय अनुदान आयोग
**University Grants Commission**
(मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार)
(Ministry of Human Resource Development, Govt. of India)
बहादुरशाह ज़फ़र मार्ग, नई दिल्ली-110002
Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110002
Ph.: 011-23239337, 23236288,
Fax : 011-23238858, email : jssandhu.ugc@nic.in

D.O.No.F.1-1/2017(Secy) 4th August, 2017

***Dear Sir/Madam,***

The year 2017 is a landmark year as it is the 75th year of 'Quit India Movement' and 70th year of India's Independence. Keeping in view the importance of this year and to commemorate the great events and sacrifices of our revered freedom fighters, the Ministry of Human Resource Development and University Grants Commission desires that the following activities should be undertaken by all the higher educational institutions to sensitize the students towards the freedom struggle and Quit India Movement which led to securing of India's Independence:

- Undertake the activities like invited talks by eminent educationists on freedom struggle anytime between 9th to 30th August, 2017. This will be called 'New India Manthan'. Declamations and debates should be organised during this period.
- The Hon'ble Prime Minister's endeavour to have a terrorism-free, caste-free, corruption-free, uncleanness-free and poverty-free society would only actualise with the help of the society and make his vision a reality. Accordingly you are requested to kindly organize pledge taking ceremony on 9th August, 2017 at 9.30 AM by all students, faculty and non-teaching staff of the institution. The pledge format will be uploaded on UGC website shortly.
- Faculty should be requested to conduct guided tour of the students to the memorials of freedom fighters and places/houses of any martyr from military, para-military and police, who helped to preserve the integrity of the country, in the vicinity of the Institution, to acquaint the students about contribution of the freedom fighters.
- A quiz competition will be organised in which it is desired that maximum students should participate so that they are sensitized to the contribution of our freedom fighters and also regarding the events as they unfolded during the freedom struggle. Details of the competition will be made available shortly on the UGC website and on www.mygov.in. Students may give answers in online and offline mode.

You are requested to undertake the above activities in your esteemed University and affiliated colleges and publicize them so that general public is made aware. The activities undertaken during this momentous month should be shared in the forms of photographs and reports on a dedicated facebook page of MHRD.

With warm regards,

Yours sincerely,

**(Jaspal S. Sandhu)**

**The Vice-Chancellor of all Universities.**

Copy to :

Publication Officer, University Grants Commission, New for uploading on UGC website.

**(Jaspal S. Sandhu)**